भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१

## ( सन १९९१ चा अधिनियम क्रमांक ४२ )

[ १५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान ]

# THE PLACES OF WORSHIP (SPECIAL PROVISION) ACT, 1991

## ( Act No. 42 of 1991 )

**[ As in force on the 15th June 1996 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२००४

[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्लेसेस ऑफ वरशिप (स्पेशल प्रोव्हिजन्स) ॲक्ट, १९९१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर १९९७ यात पृष्ठे ११३ ते ११४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.–हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक २२ डिसेंबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Place of Worship (Special Provisions) Act, 1991 as on the 15th June 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 8, dated 22nd December 1997 on pages 113 to 114.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (a) of the Authoritative Text (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Date : 22nd December 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

एच ४३८७ (१०४०–७-२००४)

# उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. उपासना स्थानामध्ये रुपांतर करण्यास आडकाठी करणे.

४. विवक्षित उपासना स्थानाचे धार्मिक स्वरूप जाहीर करणे आणि न्यायालयाच्या अधिकारितेस रोध करणे इत्यादी.

५. हा अधिनियम रामजन्मभूमी–बाबरी मशिदीला लागू नसणे.

६. कलम ३ च्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

७. अन्य अधिनियमितीला अधिनियम अधिभावी ठरणे.

८. १९५१ च्या अधिनियम क्र. ४३ चे विशोधन.

# उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१

## (१९९१ चा अधिनियम क्रमांक ४२)

(१५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान)

[१८ सप्टेंबर १९९१]

**कोणत्याही उपासना स्थानाचे रूपांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असल्याप्रमाणे कोणत्याही उपासना स्थानाचे धार्मिक स्वरूप टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या बेचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, '' उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१ '', असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार, ज़म्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) कलमे ३, ६ व ८ चे उपबंध ताबडतोब अंमलात येतील आणि या अधिनियमांचे उर्वरित उपबंध ११ जुलै १९९१ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) '' या अधिनियमाचा प्रारंभ '' याचा अर्थ, ११ जुलै १९९१ रोजी होणारा या अधिनियमाचा प्रारंभ, असा आहे ;

(ख) '' रूपांतर '' या शब्दाच्या व्याकरणिक रूपभेदासह त्यात कोणत्याही स्वरूपाचे बदल किंवा फेरबदल यांचा समावेश आहे ;

(ग) '' उपासना स्थान '' याचा अर्थ, मंदिर, मशीद, गुरुद्वार, चर्च, मठ किंवा कोणत्याही धार्मिक संप्रदायाचे किंवा त्याच्या एखाद्या शाखेचे कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे, इतर कोणतेही सार्वजनिक धार्मिक उपासना स्थान, असा आहे.

उपासना स्थानामध्ये रूपांतर करण्यास आडकाठी करणे.

**३.** कोणत्याही व्यक्तीला कोणताही धार्मिक संप्रदाय किंवा त्याची कोणतीही शाखा यांच्या उपासना स्थानांचे, त्याच धार्मिक संप्रदायाच्या इतर शाखांच्या उपासना स्थानांमध्ये किंवा वेगळ्या धार्मिक संप्रदायांच्या किंवा त्याच्या कोणत्याही शाखेच्या उपासना स्थानामध्ये रुपांतर करता येणार नाही.

विविक्षित उपासना स्थानांचे धार्मिक स्वरूप जाहीर करणे आणि न्यायालयाच्या अधिकारितेस रोध, इत्यादी.

**४.** (१) याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असलेले उपासना स्थानाचे धार्मिक स्वरूप त्या दिनांकाला जसे होते तसेच ते पुढे चालू राहील.

(२) जर या अधिनियमाच्या प्रारंभी १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही उपासना स्थानाच्या धार्मिक स्वरूपाच्या रूपांतराबाबत कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण यांच्या समोर प्रलंबित असेल तर, ती समाप्त होईल आणि अशा बाबीसंबंधीचा कोणताही दावा, अपील किंवा कार्यवाही, या अधिनियमाच्या प्रारंभी किंवा त्यानंतर कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांच्याकडे दाखल करण्यात येणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही उपासना स्थानाच्या धार्मिक स्वरूपात, १५ ऑगस्ट १९४७ नंतर रूपांतर करण्यात आले, या कारणावरून सुरू करण्यात आलेल्या किंवा दाखल करण्यात आलेला जर कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी प्रलंबित असेल तर, असा दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही अशाप्रकारे समाप्त होणार नाही व असा प्रत्येक दावा, अपील किंवा अशी अन्य कार्यवाही पोट-कलम (१) च्या उपबंधानुसार निकालात काढली जाईल.

(३) पोट-कलम (१) व पोट-कलम (२) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू होणार नाही :—

(क) उक्त पोट-कलमामध्ये उल्लेख केलेली, प्राचीन स्मारक शिल्प आणि पुरातत्वीय स्थळ व अवशेष अधिनियम, १९५८ (१९५८ चा २४) याच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याच्या कक्षेत येणारी प्राचीन व ऐतिहासिक स्मारके किंवा पुरातत्त्वीय स्थळे किंवा अवशेष असलेली कोणतीही उपासना स्थाने ;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही प्रकरणाबाबत, न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांनी अंतिम निर्णय दिलेला, मिटवलेला किंवा निकालात काढलेला कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही ;

(ग) अशा प्रारंभापूर्वी, संबंधित व्यक्तींनी आपापसात मिटवलेला, संबंधातील एखादा वाद ;

(घ) अशा आरंभापूर्वी मूक संमती देऊन अशा प्रकारे कोणत्याही स्थळाचे घडवून आणलेले कोणतेही रूपांतर ;

(ङ) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आडकाठी असल्यामुळे कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यामध्ये आव्हान देण्याजोगे नसलेले असे, अशा प्रारंभीपूर्वी घडवून आणलेले अशा कोणत्याही स्थळाचे कोणतेही रूपांतर.

हा अधिनियम रामजन्मभूमी-बाबरी मशिदीला लागू नसणे.

५. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, उत्तर प्रदेश राज्यातील अयोध्या येथे असलेल्या रामजन्मभूमी-बाबरी मशीद म्हणून साधारणतः ओळखल्या जाणाऱ्या स्थळाला किंवा उपासना स्थानाला आणि उक्त स्थान किंवा उपासना स्थान यांच्या संबंधातील कोणत्याही दाव्याला, अपिलला किंवा अन्य कार्यवाहीला लागू होणार नाही.

कलम ३ च्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

६. (१) जो कोणी कलम ३ च्या उपबंधाचे उल्लंघन करील, तो तीन्न वर्षापर्यंत असू शकेल इतक्या अवधीच्या कारावासाच्या शिक्षेस व द्रव्यदंडासही पात्र असेल.

(२) जो कोणी पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा असा अपराध करण्यास भाग पाडील आणि अशा प्रयत्नात तो, अपराध घडण्याजोगी कोणतीही कृती करील तो, त्या अपराधासाठी तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र ठरेल.

(३) जो कोणी कलम (१) खालील शिक्षापात्र असलेला अपराध घडवून आणण्यास अपप्रेरणा देईल किंवा असा अपराध घडवून आणण्याच्या कटात सामील होईल, तो अशा अपप्रेरणेच्या किंवा कटाच्या परिणामी, अपराध घडला नसला तरीही, आणि भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम ११६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या अपराधासाठी असलेल्या शिक्षेस पात्र ठरेल.

अन्य अधिनियमितीला अधिनियम अधिभावी ठरणे.

७. या अधिनियमाचे उपबंध, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये विसंगत काहीही अंतर्भूत असले तरीही, परिणामक होतील.

१९५१ च्या अधिनियम क्रं. ४३ चे विशोधन.

८. लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ८ मधील पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (झ) मध्ये शेवटी " किंवा " हा शब्द समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) अशा विशोधित केलेल्या खंड (झ) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ज) उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१, यांचे कलम ६ (उपासना स्थानांचे रुपांतर करण्याचा अपराध)".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई